**ठळक बातम्या**

- आफ्रिकी देशांच्या दौऱ्याच्या अखेरच्या टप्प्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची आज मालावीला भेट
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची बैठक सध्या चंडीगढमध्ये सुरू
- महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यानंतर राजकीय हालचालींना आणि प्रशासकीय तयारीला वेग
- झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना उद्या जारी होणार
- कॅनडा सरकारचे आरोप भारतानं ठामपणे फेटाळले

  **आणि**
- न्यूझीलंड विरुद्ध भारत कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताचा डाव अवघ्या ४६ धावात गारद, न्यूझीलंडच्या पहिल्या डावात ३ बाद १८० धावा.

**<><><><><>**

भारत आणि मालावी दरम्यान नेहमीच सौहार्दाचे संबंध राहिले असून मालावीला १९६४ मधे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रथम राजनैतिक संबंध स्थापित करणारा भारत हा पहिला देश होता असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. मालावीमधे लिलोंग्वे इथं भारत मालावी व्यापार परिषदेला आज त्या संबोधित करीत होत्या. भारत मालावीचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार असून मालावीत सर्वाधिक गुंतवणूक करणारा देश असल्याचा उल्लेख त्यांनी केला. आफ्रिकी

देशांच्या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात राष्ट्रपती आज मालावीमधे आहेत. तिथे त्या भारतीय समुदायाशीही संवाद साधणार आहेत.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची बैठक सध्या चंडीगढमध्ये सुरू आहे. या बैठकीला भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आणि गृहमंत्री अमित शहा देखील उपस्थित आहेत. सध्या १३ मुख्यमंत्री आणि १६ उपमुख्यमंत्री भाजपाचे असून महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, बिहार, सिक्कीम, नागालँड आणि मेघालयचे मुख्यमंत्री हे भाजपाच्या मित्रपक्षांचे आहेत.

<><><><><>

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपाबाबत आतापर्यंत २१६ जागांवर सहमती झाली आहे, असं विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत  सांगितलं. काँग्रेसच्या ८४ जागांवरच्या उमेदवारांची छाननी झाली असून रविवारी या ८४ किंवा काँग्रेसच्या सर्व जागांवरचे उमेदवार जाहीर होण्याची शक्यता त्यांनी वर्तवली. समाजवादी पक्षाला महाविकास आघाडी काही जागा देणार आहे, असंही ते म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुण्यातल्या ६०० पदाधिकाऱ्यांनी नुकताच सामूहिक राजीनामा दिला आहे. पक्षाचे पुण्याचे शहराध्यक्ष दीपक मानकर यांना विधानपरिषदेच्या राज्यपाल नियुक्त आमदारांमध्ये संधी न दिल्यामुळे कार्यकर्ते नाराज झाल्यामुळे हा राजीनामा दिल्याचं सांगण्यात येत आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी परिवर्तन महाशक्तीच्या बैठकीत सुमारे दीडशे मतदार संघांवर एकमत झालं आहे, अशी माहिती, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी दिली. या बैठकीसाठी महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे संभाजीराजे छत्रपती , प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू, स्वतंत्र भारत पक्षाचे वामनराव चटप, महाराष्ट्र राज्य समितीचे शंकर अण्णा धोंडगे, भारतीय जवान किसान पक्षाचे नारायण अंकुशे आणि इतर अनेक समविचारी नेते एकत्रित आले होते.

**<><><><><>**

नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसनं रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी जाहीर केली आहे. नांदेडचे दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण त्यांचे वडील होते.

**<><><><><>**

**महाराष्ट्र** विधानसभेसाठी निवडणूक लढवणारे उमेदवार आणि त्यांच्या राजकीय पक्षांना सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार गुन्हेगारी पार्श्वभूमी प्रसिद्धी करावी लागणार आहे. उमेदवाराविरुद्ध प्रलंबित गुन्हेगारी खटल्यांची माहिती निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर, Know Your Candidate या लिंकवर उपलब्ध असेल.

राज्यात होणाऱ्या  विधानसभा निवडणूक प्रचारात काळ्या पैशाचा वापर होत असल्याचं नागरिकांच्या  निदर्शनास आल्यास त्यांनी आयकर विभागाला त्याची माहिती द्यावी असं आवाहन आयकर अधिकाऱ्यांनी केलं आहे. अशी माहिती देणाऱ्या व्यक्तीची ओळख गुप्त ठेवण्यात येईल.

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठीचा कार्यक्रम केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केल्यानंतर राज्यातल्या सर्व जिल्ह्यात निवडणूकपूर्व तयारीला सुरुवात झाली आहे.

**रत्नागिरी** जिल्ह्यात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तपास नाके उभारण्यात आले असून सर्व वाहनांची कसून तपासणी करण्यात येत असल्याची माहिती पोलीस अधीक्षकांनी दिली.

**सांगली** जिल्ह्यात निवडणुकीची तयारी पूर्ण झाली असून प्रशासनाच्या सूचनांचं पालन सर्व राजकीय पक्षांनी करावं असं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं.

**नवी मुंबईत** विनापरवानगी लावलेल्या अनधिकृत राजकीय जाहिराती काढून टाकण्याची कारवाई महापालिकेने सुरु केली आहे. आचार संहिता लागू झाल्यानंतर महापालिकेने ४ हजार ४१८ अनधिकृत बॅनर्स आणि होर्डिंग्ज काढून टाकले आहेत.

**<><><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना उद्या जारी होणार आहे.या टप्प्यात ४३ मतदारसंघांचा समावेश असून उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत येत्या २५ ऑक्टोबरपर्यंत आहे. २८ ऑक्टोबरला अर्जांची छाननी होईल, आणि ३० ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. पहिल्या टप्प्यात १३ नोव्हेंबरला तर दुसऱ्या टप्प्यातलं मतदान २० नोव्हेंबरला होणार आहे.

**<><><><><>**

हरियाणाचे मुख्यमंत्री म्हणून नायबसिंह सैनी यांनी सलग दुसऱ्यांदा शपथ घेतली. राज्यपाल बंदारु दत्तात्रय यांनी सैनी यांच्याबरोबर आणखी १३ मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. पंचकुलामधल्या शालीमार मैदानावर झालेल्या

या शपथविधीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उपस्थित होते.

**<><><><>**

कॅनडा सरकारचे आरोप भारतानं ठामपणे फेटाळले असून, ते बिनबुडाचे असल्याचं म्हटलं आहे. भारत आणि भारतीय उच्चायुक्तांविरोधातल्या आरोपांची पुष्टी देणारा कोणताही पुरावा कॅनडा सरकारनं अद्याप दिला नसल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जैस्वाल यांनी आज नवी दिल्ली इथं पत्रकारपरिषदेत सांगितलं. दहशतवादाच्या आरोपाखाली भारतामध्ये 'वाँटेड' असलेल्यांचं प्रत्यार्पण करण्याचे 26 अर्ज आणि काही जणांना तात्पुरती अटक करण्याची विनंती कॅनडा सरकारकडे अद्याप प्रलंबित असल्याचं ते म्हणाले.

लॉरेन्स बिश्नोई टोळीच्या सदस्यांसह, अन्य टोळ्यांच्या सदस्यांबद्दलची सुरक्षा विषयक माहिती भारतानं कॅनडा सरकारला पुरवली असून, त्यांना अटक करून त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करावी, अशी विनंती केली होती. मात्र कॅनडा सरकारनं त्यावर कोणतीही कारवाई केली नाही, ही गोष्ट गंभीर असल्याचं ते म्हणाले. भारताला दोषी ठरवणं यापुढे खपवून घेतलं जाणार नाही, असं ते यावेळी म्हणाले.

**<><><><>**

मिथेनॉल, इथेनॉल आणि बायो सीएनजी सारख्या पर्यायी इंधनांमुळे भारताच पेट्रोलियमवरचं अवलंबित्व कमी होऊन आयातीत घट होऊ शकते असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत नीती आयोगाने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय मिथेनॉल कार्यशाळेत बोलत होते. सध्या पेट्रोलियमच्या आयातीवर दरवर्षी २२ लाख कोटी रुपये खर्च

होतात. पर्यायी इंधन उत्पादन वाढल्यास हा खर्च घटेल , शिवाय प्रदूषणही कमी होईल असं ते म्हणाले.

**<><><><><>**

नेपाळमधे काठमांडू इथं सुरु झालेल्या सॅफ महिला फुटबॉल स्पर्धेत भारतानं आज पाकिस्तानवर ५-२ नं मात करत, विजयी सलामी दिली. ‘अ’ गटात भारताचा दुसरा सामना येत्या २३ तारखेला बांगलादेशाबरोबर होईल. स्पर्धेतला अंतिम सामना येत्या ३० तारखेला होणार आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय क्रीडा सुशासन विधेयक २०२४ च्या मसुद्यामुळे देशात सशक्त आणि पारदर्शक क्रीडा सुशासन यंत्रणा उभी करण्यासाठी हातभार लागेल, असं केंद्रीय क्रीडामंत्री डॉ मनसुख मांडवीय यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आज झालेल्या एका सल्लागार बैठकीत ते बोलत होते. खेळाडूंना केंद्रस्थानी ठेवून काम करण्यासाठी मंडळांना सक्षम करणं, सुरक्षित क्रीडा धोरण राबवणं तसेच क्रीडा न्यायाधिकरणाची स्थापना करणं हे या विधेयकाच उद्दिष्ट असल्याचं त्यांनी सांगितलं. या बैठकीत भारतीय ऑलिम्पिक असोसिएशन, राष्ट्रीय क्रीडा मंडळ आणि  राष्ट्रीय क्रीडा प्रोत्साहन समित्यांचे सभासद उपस्थित होते.

**<><><><><>**

न्यूझीलंड विरुद्ध भारत कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात आजच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा न्यूझीलंडच्या ३ बाद १८० धावा झाल्या. आता न्यूझीलंडकडे १३४ धावांची आघाडी आहे. भारताच्या कुलदीप यादव, आर. अश्विन आणि रविंद्र जडेजा यांनी प्रत्येकी एक गडी टिपला. बंगळुरूच्या चिन्नास्वामी

मैदानावर आज झालेल्या या सामन्यात फलंदाजीला उतरलेला भारतीय संघ अवघ्या ४६ धावांमध्ये गारद झाला. कोहलीसह भारताचे पाच फलंदाज शून्यावर बाद झाले. ऋषभ पंतनं २० आणि यशस्वी जयस्वालनं १३ धावा केल्या. मॅट हेन्रीनं १५ धावात ५ गडी बाद केले. विल्यम ओरूक यानं १२ धावात ४ भारतीय खेळाडूंना तंबूत परत पाठवलं. हा या सामन्याचा दुसरा दिवस होता, कालच्या दिवसाचा खेळ पावसामुळे रद्द झाला होता.

**<><><><><>**

ज्येष्ठ मराठी चित्रपट दिग्दर्शक नारायण उर्फ एन रेळेकर यांचं काल सकाळी कोल्हापुरात त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते ७८ वर्षांचे होते. झुंज तुझी माझी, टोपीवर टोपी अशा सात मराठी चित्रपटांचं दिग्दर्शन, १० चित्रपटांचं पटकथालेखन आणि सुमारे दीडशे नाटकांचं संहितालेखन त्यांनी केलं होतं. निळू फुले, अशोक सराफ यांच्यासारख्या दिग्गज  कलाकारांसोबत त्यांनी काम केलं होतं.

**<><><><><>**

डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी.व्ही. सिंधूनं आज महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. सिंधूनं  चीनच्या हान यू हिचा १८-२१, २१-१२, २१-१६ असा पराभव केला. इतर सर्व भारतीय खेळाडूंना पहिल्या फेरीतच पराभवाचा सामना करावा लागला.